प्रशासकीय मान्यता

सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात हाफकिन बायोफार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., परेल, मुंबई यांच्याकडून सीएसआर अंतर्गत देणगी दाखल मंजूर अनुदानातून यवतमाळ, गोंदिया, कोल्हापूर, अकोला व मुंबई येथील संस्थांकरिता यंत्र खरेदीस प्रशासकीय मान्यता.

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय, क्रमांक : सीएसआर-२०१८/प्र.क्र.८९/प्रशा-१
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक : १५ मार्च, २०१८.

वाचा :
1) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय, क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६.
2) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७.
3) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/ आरोग्य-८, दिनांक ०७.०३.२०१८.
4) शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.१७/१८/कोषा.प्रशा-५, दिनांक २९.०१.२०१८.
5) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे पत्र क्र : संवैशिवसं/स.अ.नमुद-शामवरुयंसाख/३-म/२०११/२०१८, दिनांक : २३.०३.२०१८.

शासन निर्णय :-

सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात हाफकिन बायोफार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., परेल, मुंबई यांच्याकडून सीएसआर अंतर्गत देणगी दाखल यवतमाळ, गोंदिया, कोल्हापूर, अकोला व मुंबई येथील संस्थांकरिता यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी संचालनालयास रुपये २६,०१,८००/- इतके अनुदान मंजूर करण्यात आले आहे. सदर अनुदानातून एकूण रुपये २६,०१,८००/- (अक्षरी रुपये सव्वीस लक्ष एक हजार आठशे फक्त) इतक्या रकमेची खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे यंत्रसामुग्री खरेदी करण्यास या शासननिर्णयान्वये पुढील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.		यंत्राचे नांव	नग	प्रती नग किंमत	एकूण किंमत	प्रशासकीय मान्यतेची रक्कम
१.	श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ	इन्फ्युजन पंप	५	४५,०००	२,२५,०००	२,२५,०००
		डिफिब्रीलेटर	१	२,९६,८००	२,९६,८००	२,९६,८००
		टेम्परररी स्पेस मेकर	२	१,००,०००	२,००,०००	२,००,०००
		बेडसाईड एकपीओटू पेशंट मॉनीटरींग सिस्टीम	१	१,००,०००	१,००,०००	१,००,०००
२.	शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया	इन्फ्युजन पंप	४	४५,०००	१,८०,०००	१,८०,०००
		रेडियंट वॉर्मर	७	५०,०००	३,५०,०००	३,५०,०००
३.	छत्रपती प्रमिला राजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर	इन्फ्युजन पंप	४	४५,०००	१,८०,०००	१,८०,०००
		रेडियंट वॉर्मर	७	५०,०००	३,५०,०००	३,५०,०००
४.	शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला	इन्फ्युजन पंप	४	४५,०००	१,८०,०००	१,८०,०००
		रेडियंट वॉर्मर	७	५०,०००	३,५०,०००	३,५०,०००
५.	सर ज.जी. समूह रुग्णालये, मुंबई	इन्फ्युजन पंप	४	४५,०००	१,८०,०००	१,८०,०००
		रेडियंट वॉर्मर	७	५०,०००	३,५०,०००	३,५०,०००
	एकूण				**२६,०१,८००**	**२६,०१,८००**

अटी :-

१. निधीच्या माध्यमानुसार शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक संकीर्ण २०१८/प्र.क्र.१७/१८/ कोषा.प्रशा-५, दिनांक २९.०१.२०१८ अन्वये आर्थिक वर्षाच्या अखेरीस खरेदीच्या प्रस्तावांबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबतचे निर्बंध लागू होणार नाहीत.

२. सदर प्रशासकीय मान्यता वर्षात हाफकिन बायोफार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., परेल, मुंबई यांच्याकडून सीएसआर अंतर्गत देणगी दाखल मंजूर निधीतून प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर यंत्रसामुग्री हाताळणीसाठी नव्याने पदनिर्मितीची आवश्यकता नाही, याबाबत संचालनालयाने व संबंधित अधिष्ठाता यांनी खातरजमा करावी.

४. सदर विषयी "शासकीय विभागाने करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तिका" याबाबत उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभागाने निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/ उद्योग-४, दिनांक ०१.१२.२०१६ मध्ये नमूद केलेल्या विहीत कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.

५. सदर यंत्रसामुग्री खरेदी विषयक प्रक्रिया "औषधे, तद्अनुषंगीक उपभोग्य वस्तू व वैद्यकीय उपकरणे या बाबींची खरेदी हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि. मार्फत करण्याबाबत" निर्गमित शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक खरेदी-२०१६/प्र.क्र.२४०/आरोग्य-८, दिनांक २६.०७.२०१७ नुसार करावी.

६. सदर यंत्रसामुग्रीची आवश्यकता असल्याचे व त्याची किंमत बाजारभावापेक्षा जास्त नसल्याची खात्री संचालक (वै.शि.) तसेच संबंधित अधिष्ठाता यांनी करावी.

७. सदर यंत्रसामुग्रीची विनिर्दिष्टे व्यापक, सर्वसमावेशाक असून त्यानुसार यंत्रपुरवठा करु शकणारे किमान तीन उत्पादक/पुरवठादार यांचेकडून तीन निविदा प्राप्त होऊ शकतील अशा प्रकारची आहेत, असे संचालक (वै.शि.) यांनी प्रमाणित करावे.

८. प्रस्तावित यंत्रसामुग्रीचा समावेश इतरत्र कोणत्याही प्रस्तावात अंतर्भुत केलेला नसल्याबाबत व सदर यंत्रसामुग्री संबंधित संस्थेस आवश्यक असल्याबाबत संचालकांनी खात्री करावी.

९. मुख्य यंत्र व त्यांचे सुटे भाग (Accessories) यांच्या किंमती भिन्न दर्शविणे आवश्यक राहील.

१०.सदर विषयी यंत्रसामुग्री खरेदीबाबत निर्णय घेताना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेल्या लेखाशिर्षाखाली मंजुर अनुदानाच्या तरतूदीपेक्षा जास्त खर्च केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

११.उपरोक्त शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार व कामगार विभाग, दिनांक ०१.१२.२०१६ मधील परिच्छेद क्रमांक ३.१.२ "किंमतीचा अंदाज व किंमतीचा वाजवीपणा" या शीर्षकाखालील परिच्छेद क्रमांक ३.१.२.१ मधील तरतूदीचे राज्यस्तरीय खरेदी समितीने अनुपालन करावे. सदर तरतूदीचे अनुपालन केलेल्या यंत्राच्या किंमतीस आवश्यकतेनुसार सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

२. या प्रयोजनासाठी उपरोक्त तक्यात नमूद केल्यानुसार येणारा यंत्रनिहाय खर्च सदर संस्थेस सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात हाफकिन बायोफार्मास्युटीकल्स कॉर्पोरेशन लि., परेल, मुंबई

यांच्याकडून सीएसआर अंतर्गत देणगी दाखल यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी मंजूर असलेल्या रुपये २६,०१,८००/- इतक्या अनुदानातून भागविण्यात यावा व खर्ची टाकण्यात यावा.

३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक: विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/१३/विनियम, दिनांक १७.०४.२०१५ अन्वये तसेच वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग-१, उप विभाग -२, अनुक्रमांक-३, नियम क्रमांक-७ अनुसार प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारान्वये हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०३१५१२०१०१०९१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.03.15 12:09:20 +05'30'

(अ.मु. डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखाकार - १/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२. व्यवस्थापकीय संचालक, हाफकिन बायो-फामास्युटीकल्स कॉपोरेशन लि., मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई.
४. अधिष्ठाता, सर ज.जी. समूह रुग्णालये, मुंबई.
५. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अकोला.
६. अधिष्ठाता, छत्रपती प्रमिला राजे सर्वोपचार रुग्णालय, कोल्हापूर.
७. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया.
८. अधिष्ठाता, श्री. वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर/अकोला/यवतमाळ/गोंदिया.
१२. निवडनस्ती (प्रशा-१).